// गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)
(कुलसचिव कार्यालय)
एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/8724/२०१५ दिनांक २९/१२/२०१५

**प्रति,**

**सर्वश्री सन्माणनिय प्राचार्य तथा**
**प्राध्यापक वृंद**

**विषय :– परिषदेच्या स्मरणीकेसाठी शोधनिबंध पाठविणेबाबत....**

आदरणीय महोदय,

आपणास सहर्ष कळवित आहोत की, विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे राज्यस्तरीय सहावे अधिवेशन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक २८, २९ जानेवारी, २०१६ ला संपन्न होत आहे. या अधिवेशनाच्या चर्चेसाठी **"ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील संशोधनाची आव्हाणे"** हा विषय निश्चित करण्यात आला आहे.

सामाजिक आर्थिक विकासाची घोडदोंड सुरू असतांना व भारताला जगाची महासत्ता बनविण्याचे स्वप्न पहात असतांना याच देशाचा एक भाग **"दुर्गम ग्रामीण आदिवासी समाज"** विकासा पासून शेकडो मैल दुर फेकल्या जात आहे. शासन स्तरावरून विविध प्रयत्न होत असूनही अपेक्षीत यश पदरात पडत नाही याचे खरे कारण मुलभूत संशोधनाचा अभाव होय. **"जखम गुडघ्याला व मलम कपाळाला"** असा काहीसा प्रकार दिसतो. बाहेरच्या व्यक्तीनी केलेल्या संशोधन कार्यापेक्षा स्थानिक संशोधकाकडून झालेले संशोधन व त्यांनी सुचविलेले उपाय अनेक पटीने सरस ठरतात व हेच महत्वपूर्ण काम आपल्या स्तरावरून व्हावे, त्यावर मंथन व कार्य घडावे याचसाठी प्रस्तुत विषय चर्चेसाठी ठेवला आहे. त्याचे उप विषय पुढील प्रमाणे आहेत.

१. दुर्गम भागातील सामाजिक आर्थिक विकास आणि संशोधन.
२. वंचितांच्या वल्गना आणि सामाजिक संशोधन.
३. आदिवासी संस्कृतीचे उच्चाटन आणि सामाजिक संशोधन.
४. दुर्गम क्षेत्रातील पारंपारिक वैद्यकिय सेवा आणि संशोधन.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेती विकासाचा दृष्टीकोण.

वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर शोध निबंध लिहुन आयोजकांकडे दिनांक १६ जानेवारी, २०१६ पर्यंत पाठविण्यात यावा. ISBN नंबर असलेल्या स्मरणिकेत त्याचा समावेश करण्यात येईल.

**शोध निबंधाबाबत सुचना** :–

१. आपला शोध निबंध मराठीमध्ये कृतिदेव १०, फान्टसाईज १४ मायक्रोसाफट वर्डमध्ये व इंग्रजी निबंध Times New Roman Font Size-12 Microsoft Word मध्ये असावा.
२. शोध निबंधाची शब्द मर्यादा १५०० ते २००० असावी.
३. आपला शोध निबंध दि. १६ जानेवारी, २०१५ पर्यंत registrar.gondwanauniversity@gmail.com या इमेलवर पाठविण्यात यावा.
४. त्याची एक हार्ड कॉपी डॉ. बी. एम. क–हाडे, अध्यक्ष, विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद, आशादिप, लुम्बीनी नगर, ब्रम्हपूरी जि. चद्रपूर 441206 या पत्यावर पाठविण्यात यावा.

**प्रतिनिधी शुल्क** :–

१. प्राध्यापक निबंधासह :– १,०००/–
२. प्राध्यापक निबंधाशिवाय :– ६००/–
३. विद्यार्थी निबंधाशिवाय :– ३००/–

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली